# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जा.क्र. मजीप्रा–1098/सभा–82/आ.4

दिनांक : 19 जानेवारी 1999

विषय : दिनांक 7/1/1999 रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 82 व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक 7 जानेवारी 1999 रोजी झालेल्या 82 व्या सभेच्या कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन खालिलप्रमाणे निर्णय घेण्यांत आले. या सर्व सभेचे कार्यक्रम बाब इतिवृत्त खालीलप्रमाणे तयार करण्यांत आले आहे. त्यास मंजुरी मिळावी ही विनंती.

जे.एस.साहनी

(जे.एस.साहनी)

सदस्य सचिव (प्रशासन)

मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.

(२)

# दि.७ जानेवारी, १९९९ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८२ व्या बैठकीचे अितिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८२ वी बैठक मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.अण्णासाहेब डांगे, यांचे अध्यक्षतेखाली दि.७ जानेवारी,१९९९ रोजी संपन्न झाली. या बैठकीस खालील सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१) मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष
२) मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
३) श्री.व्ही.रंगनाथन,अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
४) श्री.भानुदास पडळकर,सदस्य
५) श्री.आदिनाथ नवलेपाटील,सदस्य
६) श्री.सुरेश पटवर्धन,सदस्य
७) श्री.माधव कुलकर्णी, सदस्य
८) श्री.आशिष कुलकर्णी,सदस्य
९) श्री.देवेंद्र फडणवीस,सदस्य
१०) श्री.प्रभू,उपसचिव,वित्त विभाग(प्रधान सचिव,वित्त विभाग यांचे प्रतिनिधी)
११) श्री.रमेशकुमार, सचिव,ग्राम विकास विभाग
१२) श्री.जतिंदरसिंग साहनी,सदस्य सचिव(प्रशासन),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
१३) श्री.राजेंद्र सगणे,सदस्य सचिव(तांत्रिक),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी ''विशेष निमंत्रित'' म्हणून उपस्थित होते.

१) श्री.शे.दौ.अरमाळ,मुख्य अभियंता व विशेष कार्य अधिकारी,म.जी.प्रा.
२) श्री.भा.आ.डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
३) श्री.अ.ना.अळवणी,मुख्य अभियंता,कोकण प्रदेश,ठाणे.
४) श्री.नि.कृ.माडा,मुख्य प्रशासकीय अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
५) श्री.मिलिंद केळकर,अधीक्षक अभियंता(समन्वय),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई

मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी प्रस्तावित कार्यक्रम बाबींवर चर्चा करण्याचे निर्देशित केल्यानंतर सभेस सुरुवात झाली.

## कार्यक्रम बाब क्र.१:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८१ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८१ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी देण्याबाबत चर्चा करण्यात आली. ८० व्या बैठकीमधील कार्यक्रम बाबी बाबत काही मुद्दे श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी उपस्थित केले असता,याबाबत पुढे सविस्तर चर्चा करु, प्रथम इतिवृत्तास मंजुरी देण्यात यावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले. त्यांनी असेही सूचित केले की, या विषयावर चर्चा करीत असतांना अितिवृत्तात काही चूक नाही ना अथवा काही बाबींचा अुल्लेख राहिलेला नाही ना अेवढेच तपासले जाणे अपेक्षित आहे. केलेल्या कार्यवाही बाबतचे मुद्दे त्या बाबीवर चर्चा करतांना मांडण्यात यावेत. तद्नंतर, ८१ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

प्राधिकरणाच्या ८१ व्या बैठकीच्या इतिवृत्तामधील ८० व्या सभेच्या कार्यक्रम बाबीबाबत आक्षेप घेतला होता, त्याबाबत काय कार्यवाही करण्यांत आली याचा या इतिवृत्तामध्ये समावेश नसल्याचे, श्री.माधव कुलकर्णी,यांनी, निदर्शनास आणून दिले. एखादया कामाचे देकार प्राप्त झाल्यानंतर ते सर्व एकाच वेळी उघडणे अपेक्षित असताना, एक देकार १० दिवसानंतर उघडण्यात आल्याचे मुख्य अभियंता,पुणे,यांनी त्यावेळी मान्य केले होते. या संदर्भात अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी

....२....

सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांना संबंधित मुख्य अभियंता,यांच्याकडून अहवाल मागवून तो मा.मंत्री महोदयांना सादर करावा अशा सूचना दिल्या होत्या. त्याबाबत काय कार्यवाही झाली? सदर कामाच्या निविदा पुन्हा का बोलाविण्यांत आल्या नाहीत ? अशी विचारणा, श्री.माधव कुलकर्णी,यांनी केली.याबाबत सदस्य सचिव(प्रशासन व अर्थ) यांनी केलेल्या कार्यवाहीचा खुलासा केला. तथापि, याबाबत माहिती घेवून पुढील बैठकीच्या वेळी ह्याविषयी सदस्यांच्या निदर्शनास आणून दयावे असे ठरविण्यांत आले.तसेच श्री.सूर्यप्रकाश राव यांचे काम समाधानकारक नसताना, त्यांना पुन: ७ कोटी रुपयांचे काम देण्यांत आले किंवा कसे, याबाबत पुढील बैठकीत माहिती देण्यांत यावी अशा सूचना दिल्या होत्या. त्याबाबतही केलेल्या कार्यवाहीचा या इतिवृत्तामध्यें उल्लेख नसल्याचे, श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी निदर्शनास आणून दिले. याबाबत पुढील बैठकीत माहिती देण्यांत येईल असे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सांगितले. मात्र असमाधानकारक कामें होवू नयेत, त्यामुळे एका कंत्राटदारास किती कामे दयावीत याबाबत निर्णय घेवून, तसें परिपत्रक काढण्यात आल्याचे सांगण्यात आल्यानंतर या मुद्याबाबतची चर्चा पूर्ण करण्यांत आली.

मु.प्र.अ.

अ.अभि. समन्वय

मे.सुरेंद्र इंजिनिअरिंग कंपनी,मुंबअी, यांच्याकडून करण्यांत येणाऱ्या कामांची माहिती, प्रत्यक्षात झालेला खर्च, एक्स्ट्रा आयटेम, एस्कलेशन इत्यादी संबंधीची माहिती या बैठकीत सादर होणे अपेक्षित होते असे श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी निदर्शनास आणून दिले असता, याबाबतची बहुतांशी माहिती प्राप्त झाली असून ती संकलीत करुन व उर्वरित माहिती त्वरीत मागविण्यांत येवून ती निविदा समितीच्या दि.१९/१ /९९ च्या बैठकीत ठेवण्यांत येईल व त्याची प्रत सदस्यांना देण्यात येईल असे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सांगितले व ते मान्य करण्यांत आले.

अ.अभि. समन्वय

अ.अभि. समन्वय.

मे.सुभाष प्रॉजेक्टस्,दिल्ली व श्रीराम इंजिनिअरींग कंपनी,चेन्नई, या दुसऱ्या राज्यातील कंत्राटदारांनी प्राधिकरणाकडे भरलेले देकार फार कमी असल्याने ते कामे पूर्ण करतील का, याबाबत प्राधिकरणाच्या ८० व्या सभेमध्ये चर्चा केली असता, या कंत्राटदारांनी ज्या राज्यामध्ये कामे केलेली आहेत तेथून अहवाल मागविण्यांत यावे असे ठरविण्यांत आले होते, त्याचे काय झाले याची विचारणा, श्री.माधव कुलकणी,सदस्य व मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांच्याकडून करण्यात आली. यावर सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सांगितले की, इतर राज्यांकडे वरील कंत्राटदारांनी केलेल्या कामासंबंधी विचारणा केली असता, प्रतिसाद मिळाला नाही. याबाबत काय अडचण आहे हे स्पष्ट होत नाही. मात्र असा प्रतिसाद, निदान फोनवर तरी, मिळायला हवा, असा मुद्या अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी मांडला. त्यावर मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता ,यांनी स्पष्ट केले की, अशा पध्दतीची माहिती इतर राज्यांनी दिलीच पाहिजे असे बंधन घालता येणार नाही. तरीसुध्दा,आपले अधिकारी दिल्ली येथे बैठकीसाठी जातात, तेंव्हा याबाबतची माहिती ते मिळवू शकतील, हे मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांनी निदर्शनास आणून दिले. या अनुषंगाने पुन: प्रयत्न करुन माहिती मिळविण्यात यावी, असे अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी सांगितले. त्यानंतर या विषयावरील चर्चा संपविण्यांत आली.

**<u>कार्यक्रम बाब क्र.२:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८१ व्या सभेतील बाबींवर करण्यात आलेली कृती.</u>**

या कार्यक्रम बाबीची माहिती स्पष्ट करताना, सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील ठेकेदारांची नोंदणी करण्याच्या नियमांत सुधारणा करण्यांत आली असून त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यांत आलेली आहे.

रत्नागिरी मंडळाची इमारत व अधीक्षक अभियंता,यांचे निवासस्थान बांधणे याबाबत मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यानी ८१ व्या सभेमध्ये व्यक्त केलेल्या अभिप्रायानुसार तयार इमारत घेण्याविषयी जाहिरात दिली असता, दोन्ही वेळा प्रतिसाद मिळू शकला नाही, असे मुख्य अभियंता व विशेष कार्य अधिकारी,यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावेळी मा.राज्यमंत्री महोदयांनी या निविदा कधी व कोणत्या वर्तमानपत्रांत प्रसिध्द केल्या होत्या, याची विचारणा केली असता, सदर माहिती उपलब्ध नसल्याने, ती मा.राज्यमंत्री महोदयांना देणे शक्य झाले नाही. मात्र या निविदा रत्नागिरी येथील Leading Local News Paper मध्ये देण्यांत आल्याचे, श्री.अरमाळ,मुख्य अभियंता व विशेष कार्य अधिकारी, यांनी सांगून ही माहिती लवकरच मा.राज्यमंत्री महोदयांना देण्यांत येईल असेही स्पष्ट केले. परंतु, या सोबतच नवीन इमारत बांधण्याचा देकार प्राप्त झाला असून तो ६% कमी दराचा असल्याचे स्पष्ट करण्यात आले. यावर

....३....

मा.राज्यमंत्री महोदयांनी विचारणा केली की, या देकारानुसार बांधकामाचा प्रति चौरस फूट दर काय येतो. यावर तो साधारणपणे ५३९ रु.प्रति चौरस फूट येत असल्याचे, श्री.अरमाळ,मुख्य अभियंता व विशेष कार्य अधिकारी, यांनी सांगितले.याबाबत, मा.राज्यमंत्री महोदयांनी असे स्पष्ट केले की, प्राधिकरण ज्या अिमारती बांधेल त्या वैशिष्ठयपूर्ण असाव्यात. जेणेकरुन अिमारत बघताच, ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची असल्याचे स्पष्ट व्हावे.प्राप्त निविदा कमी दराच्या असल्यामुळे, त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याची मान्यता या सभेत देण्यात आली . मात्र याबाबतचे संकल्पन/आराखडा व नकाशा, मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांना त्वरीत दाखविण्यात यावा व त्यांच्या अभिप्रायानुसार इमारतीचे स्वरुप असावे, असे ठरले.

याबाबत अपर मुख्य सचिवांनी विचारणा केली की, मागील बैठकीमध्ये कोल्हापूरच्या बेरी आर्किटेक्टसह इतर ३-४ जणांकडून प्रस्ताव घ्यावयाचे होते, त्याचे काय झाले. यावर, असे प्रस्ताव अद्याप घेण्यात आले नसल्याचे मुख्य अभियंता व विशेष कार्य अधिकारी यांनी स्पष्ट केले.

८१ व्या सभेमधील इतर कार्यक्रम बाबींच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही मान्य करण्यात येवून या कार्यक्रम बाबीवरील चर्चा पूर्ण करण्यांत आली.

## कार्यक्रम बाब क्र.३:- सन १९९६-९७ चा वार्षिक प्रशासकीय अहवाल व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन १९९६-९७ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल मंजुरीबाबत.

८१ व्या बैठकीमधील चर्चेनुसार लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेदावर कार्यवाही करुन ताळमेळाअंती अद्ययावत स्थिती तयार करुन त्यावर प्राधिकरणाच्या डिसेंबर,१९९८ पूर्वीच्या अधिवेशनापूर्वी होणाऱ्या बैठकीमध्ये अहवाल पुनः ठेवण्यात यावा, असा निर्णय झाला होता. प्रशासकीय अहवाल व वार्षिक लेख्यावरील लेखा परिक्षण अहवाल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्यासाठी शासनास सादर करावयाचा होता; ही बाब सदस्य सचिव(प्रशासन ) यांनी स्पष्ट करुन, डिसेंबर,१९९८ च्या पूर्वी प्राधिकरणाची ८२ वी सभा होवू न शकल्यामुळे १९९६-९७ च्या वार्षिक प्रशासकीय अहवाल व लेखा परिक्षण अहवालास अध्यक्षांची मान्यता घेऊन, नागपूर अधिवेशनामध्यें अहवाल सादर करण्याबाबत शासनाने कळविल्यामुळे अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला. या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात यावी, यासाठी ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यांत आली आहे.

वि.स.व मु.ले.अ. यावर अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता, यांनी विचारणा केली की, या अहवालावरील आक्षेपांच्या अनुषंगाने लोकलेखा समितीसमोर साक्ष दयावी लागते, ते मुद्दे काय होते व त्याबाबत या अहवालामध्ये काय कार्यवाही करण्यात आली. यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, लोकलेखा समितीसमोर जी साक्ष दयावयाची आहे,ती १९९५-९६ च्या अहवालासंबंधी आहे. आता सादर केलेल्या अहवालावर आक्षेप प्राप्त झाल्यानंतर, त्यांचा विचार करणे योग्य ठरेल. या चर्चेनंतर अपर मुख्य सचिवांनी सदस्य सचिव(प्रशासन) यांच्याशी सहमती दर्शविली.

वि.स.व मु.ले.अ. १९९७-९८ चे लेखे त्वरीत तयार करुन ते महालेखापालांना परिक्षणासाठी सादर करावेत अशा सूचना अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी केल्या. या अनुषंगाने सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, मी स्वतः याबाबत प्रत्येक सोमवारी आढावा घेत असून हे काम जवळ-जवळ पूर्ण करण्यात आले आहे. यावर अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी याबाबतची कार्यवाही १५ दिवसात पूर्ण करावी, अशा सूचना दिल्या.

चर्चेअंती या कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात आली.

## कार्यक्रम बाब क्र४:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व इतर निर्णयावर शिक्कामोर्तब.

वेळोवेळी झालेल्या निविदा समितीच्या बैठकांमध्ये ज्या निविदा स्वीकृत करण्यात आल्या त्यांची माहिती तक्ता 'अ' मध्ये व ज्या निविदा अस्वीकृत करण्यात आल्या त्यांची माहिती तक्ता 'ब' मध्ये देण्यात

आल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सर्वांच्या निदर्शनास आणून दिले व त्यास मान्यता देण्याची विनंती केली. तक्ता 'अ' नुसार ज्या निविदा स्वीकृत करण्यात आल्या त्यांना सर्व सदस्यांनी सहमती दर्शवून मान्यता दिली. मात्र तक्ता 'ब' नुसार ज्या निविदा अस्वीकृत करण्यात आल्या आहेत त्यामधील ओझर-साकोरा व इतर २ गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कामाची जी निविदा अस्वीकृत करण्यांत आली, याबाबत काही मुद्दे श्री.माधव कुलकर्णी ,सदस्य ,यांनी उपस्थित केले.

सदर कामाचा देकार हा निविदेतील किंमतीपेक्षा जरी जास्त दिसत असला. तरी, १९९७-९८ च्या दरसूचीनुसार येणाऱ्या किंमतीशी तुलना करता, हा देकार साधारणत: ३% जास्त आहे. त्यामुळे हा देकार स्वीकृत न करण्याचे कारण स्पष्ट करण्यात यावे, असे श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी विचारले. या वर सदस्य सचिव(प्रशासन) व अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता,यांनी हे निदर्शनास आणून दिले की, नाशिक विभागांतर्गत बोलाविण्यात आलेल्या इतर निविदांच्या देकारापेक्षा हा देकार जास्त असल्यामुळे तो अस्वीकृत करण्यात आला. यावर श्री.माधव कुलकर्णी, सदस्य, यांनी असे निदर्शनास आणून दिले की, इतर विभागातील निविदा प्रचलित दरसूचीपेक्षा ५% ते ९.९८% जास्त असतांना सुध्दा स्वीकृत करण्यात आल्या मग येथेच असा निर्णय का घेण्यात आला ही बाब स्पष्ट होत नाही. यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, त्या दिवशी निविदा समितीसमोर अेकूण ३ निविदा विचारार्थ होत्या. त्यापैकी एक निविदा प्रचलित दरसूचीस १७.८०% कमी तर दुसरी निविदा २३.३२% कमी दराची होती. परंतू, वरील कामाची निविदा ३.१५% जास्ती होती. ही तफावत योग्य न वाटल्याने, जास्ती किंमतीचा देकार अस्वीकृत करण्यात आला.अेकदा निविदा समितीस निविदा स्वीकृतीबाबत प्राधिकृत केल्यानंतर समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत अशा तऱ्हेच्या शंका अुपस्थित करणे योग्य नाही, हे मा.मंत्री महोदयांनी सर्वांच्या निदर्शनास आणून देअून समितीने घेतलेल्या निर्णयाबद्दल सदस्यांची नापसंती असल्यास ती त्यांनी नोंदवावी, परंतू अशा प्रकारची चर्चा अुपस्थित करु नये, असे मा.मंत्री महोदयांनी स्पष्ट केले.

यावर, किती कमी किंमतीची निविदा किंवा किती जास्त किंमतीची निविदा नाकारावी, याचे काही निकष ठरविण्यात यावेत असा मुद्दा श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी मांडला असता याबाबत असा निकष ठरविणे शक्य होणार नाही व संयुक्तिकही ठरणार नाही, ही बाब सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केली. यास अनुसरुन अपर मुख्य सचिव,यांनी निदर्शनास आणले की, मलनि:सारण कामाची निविदा काम अवघड असल्याने जास्ती दराने येणे, वितरण व्यवस्थेच्या कामाची निविदा काम किचकट, दाट लोकवस्तीत करावयाचे असल्याने, जास्ती दराने येणे, शीर्ष कामांची निविदा, दुर्गम भागातील कामांची निविदा जास्ती दराने येणे, या बाबी सदस्यांनी समजून घ्याव्यात व वरील अस्वीकृत करण्यात आलेल्या कामाच्या निविदेबाबतचा प्रस्ताव मान्य करावा व त्यास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली. तरी सुध्दा या कामाची निविदा अस्वीकृत करुन पुन: निविदा मागविण्याच्या निर्णयाबाबत, श्री.माधव कुलकर्णी, यांचे पूर्णत: समाधान न झाल्याने, त्यांनी नापसंती दर्शवून अध्यक्षांच्या विनंतीनुसार, सहमती दर्शवून या मुद्यावरील चर्चा थांबविली.

निविदा समितीने घेतलेल्या इतर निर्णयानुसार परिपत्रके काढण्यात आल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सर्वांच्या निदर्शनास आणून दिले. या परिपत्रकांना मान्यता देण्याची विनंती करण्यात आली. निविदांमध्ये वापरावयाचे खोदकामाचे दर या संबंधीच्या पत्रामध्ये Excess Quantity साठी कोणते दर देण्यात यावेत व ते कसे काढावेत तसेच १.५ मीटर पेक्षा जास्त खोलीचे चर खणले गेल्यास त्या कामाचे देयक कसे अदा करावे या बाबी स्पष्ट करणारे आदेश यांचा समावेश करुन परिपत्रक सुधारित करा असा मुद्दा श्री.सुरेश पटवर्धन,सदस्य,यांनी मांडला व तो मान्य असल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट करुन तसे सुधारित परिपत्रक काढण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर या परिपत्रकासह व इतर सर्व परिपत्रकांना सर्वांनी सहमती दर्शविली. मात्र निविदा स्वीकृतीच्या अधिकारात कपात करणे या परिपत्रकाबाबत काही मुद्दे उपस्थित करुन त्याचे स्पष्टीकरण करण्याची विनंती, श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी केली. याबाबत मा.राज्यमंत्री महोदयांनी स्पष्ट केले की, काही क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या वाढीव अधिकाराचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यामुळे असा निर्णय घ्यावा लागला. यावर श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी असा मुद्दा मांडला की, या निर्णयामुळे निविदा स्वीकृतीबाबत वेळ लागेल . त्यावर मा.राज्यमंत्री महोदयांनी स्पष्ट केले की, अशा निविदा फारच कमी येणार असल्यामुळे फार मोठा फरक पडणार नाही. या चर्चेनंतर, श्री.माधव कुलकर्णी,सदस्य यांनी या परिपत्रकास सहमती दर्शविली.

अ.अभि. समन्वय

याबाबत पुढे चर्चा करताना, सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी निदर्शनास आणून दिले की, यापुढे प्राप्त देकारांबाबत वाटाघाटी करुन देकार कमी करणे ही प्रथा बंद करण्यांत यावी, अशा आशयाचे परिपत्रकही काढण्यांत आले आहे. याबाबत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे संदर्भात दि.२५/२/९८ रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचेकडे झालेल्या बैठकीमध्ये चर्चा करुन हा निर्णय घेण्यात आला असल्याचे स्पष्ट केले असता, श्री.माधव कुलकर्णी,सदस्य, मा.राज्यमंत्री, तसेच मा.मंत्री महोदयांनी काही मुद्दे उपस्थित केले. कमीत-कमी देकार सादर करणाऱ्या ठेकेदाराचा देकारही अवाजवी जास्त आहे असे आढळले तर किमान अशा ठेकेदाराशी वाटाघाटी करणे ही बाब आवश्यक असल्याचे सर्व सदस्यांचे म्हणणे होते. याबाबत, अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, व सदस्य सचिव(प्रशासन) यांनी निदर्शनास आणून दिले की, या परिपत्रका मागचा उद्देश असा आहे की, आज कोणताही विचार न करता, काही कंत्राटदार निविदा देकार सादर करतात व नंतर तो स्वीकृत व्हावा म्हणून वाटाघाटीच्या वेळी तो खूपच कमी करतात, या प्रकारास आळा बसावा. हा उद्देश जरी चांगला असला तरी यामुळे वाटाघाटी करणे बंद करणे हा पर्याय ठरु शकणार नाही, अशी बाजू सर्व सदस्यांनी मांडली व या परिपत्रकास स्थगिती देण्याचे ठरविण्यात आले. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग,पाटबंधारे विभाग यांच्याकडून अशा प्रकरणी सध्या काय कार्यवाही करण्यात येते ती माहिती बोलावून नंतर मुख्य सचिवांच्या बैठकीत आदेशित केल्यानुसार लागू करण्यात आलेल्या परिपत्रकाबाबत प्राधिकरणाची परवानगी मागण्यात यावी असे सांगण्यात आले. वरील विचार करण्याच्या सूचना, अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी सदस्य सचिव(प्रशासन) यांना दिल्या, त्यानंतर या मुद्यांवरील चर्चा संपविण्यांत आली.

अ.अभि. समन्वय.

**कार्यक्रम बाब क्र.५:-एक्सप्रेस टॉवर्स येथील अधिग्रहीत जागे संदर्भात सादर करण्यात आलेल्या हमीपत्रास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

एक्सप्रेस टॉवर्स येथील अधिग्रहीत जागा प्रशासकीय दृष्ट्या प्राधिकरणास आवश्यक असून या जागेचे भाडे रु.२१,५००/-प्रति महिना असे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही जागा प्राधिकरणाकडेच रहावी यासाठी हमीपत्र दि.२५/११/९८ पूर्वी दाखल करणे आवश्यक होते. हमीपत्र सादर न केल्यामुळे भविष्यात कोणतीही अडचण येवून त्यामुळे जागा सोडावी लागू नये या हेतूने व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्वोच्च न्यायालयात जर शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका फेटाळली गेली तर वाटपदार या नात्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सर्वोच्च न्यायालय जे भाडे ठरवून देईल त्यानुसार वाढीव नुकसान भरपाई/भाडे अधिग्रहीत जागेच्या मूळ मालकास बांधील राहील अशा आशयाचे हमीपत्र प्राधिकरणातर्फे निवास नियंत्रक यांना सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याकरिता सादर करण्यात आले आहे, ही बाब स्पष्ट करुन या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी दयावी, अशी विनंती सदस्य सचिव(प्रशासन) यांनी केली.

मु.प्र.अ.

या सभेमध्ये वरीलप्रमाणे हमीपत्र देण्याच्या कार्यवाहीस सर्वानुमते मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.६:- दि.१/१/९६ पासून सुधारित वेतनश्रेणी मंजुर करण्याबाबत ५ व्या केंद्रीय आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली सुधारित वेतनश्रेणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग अधिसूचना क्र.वेपूर-१२९८/प्र.क्र.१३/९८/सेवा-१० दि.१०/१२/९८ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम १९९८ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आले आहेत. राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना दि.१/१/९६ पासून लागू करण्यात आलेली वेतनश्रेणी प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यासाठी हा प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

....६....

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे स्वतंत्र नियम अस्तित्वांत नसून, राज्य शासनाचे सर्व सेवा नियम, इतर फायदे, महागाई भत्त्यांसंबंधीचे फायदे, वेतन इत्यादी बाबी प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना, जशाच्यातशा लागू करण्यांत येत आहेत. त्यामुळे यावेळी देखील सुधारित वेतनश्रेणी लागू करावी लागेल. तसेच या प्रस्तावास प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये मान्यता मिळाल्यानंतर हा प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत, वित्त विभागाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येईल व त्यांच्या मंजुरीनंतर ही वेतनश्रेणी प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येईल. याप्रमाणे वेतनश्रेणी दिल्यामुळे प्रतिवर्षी ३० कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा प्राधिकरणावर पडणार आहे आणि हा बोजा प्राधिकरणाच्या महसुलामधून भागवावा लागेल. यासाठी शासनाला कोणताही आर्थिक बोजा सोसावा लागणार नाही. दि.१/१/९६ ते ३०/९/९८ पर्यंत सुधारित वेतनश्रेणीच्या थकबाकीपोटी लागणारी रक्कम रु.२५ कोटी, एवढी आहे. तसेच दि.१/१०/९८ पासून दि.३१/३/९९ या कालावधीसाठी वाढीव वेतन व भत्त्यापोटी अंदाजे रु.१२.५० कोटी रक्कम लागणार आहे. पाचव्या केंद्रीय वेतन आयोगामुळे दयावे लागणारे वेतन व भत्त्यापोटी प्राधिकरणाच्या ९८-९९ च्या अंदापत्रकात, रु.२६ कोटी इतकी तरतूद करण्यांत आली आहे. उर्वरित रु.११.५० कोटीची अतिरिक्त तरतूद ९८-९९ च्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये करावी लागणार आहे. वरील स्थिती लक्षात घेवून, या प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती सदस्य सचिव(प्रशासन) यांनी केली.

याबाबत अपर मुख्य सचिवांनी विचारणा केली की, प्राधिकरणास सध्या आस्थापना व अवजारे (ETP Charges ) यापोटी किती निधी प्राप्त होत आहे. असा निधी साधारणत: रु.१०५ कोटी असल्याचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,यांनी सर्वांच्या निदर्शनास आणले. तसेच आस्थापना व अवजारे खर्चामधून सध्या कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर भत्ते यावर साधारणत: रु.६४ कोटी इतका खर्च येतो. यावर अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी स्पष्ट केले की, वेतन व इतर भत्ते यावर यापुढे साधारणत: रु.९४ कोटी इतका प्रत्येक वर्षी खर्च येणार आहे, तो प्राधिकरणांस आस्थापना व अवजारे या लेखा शिर्षांतर्गत करावा लागेल.

वि.स.व मु.ले.अ.
मु.प्र.अ.

अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना, जसे रु.२५०० प्रति कर्मचारी दिले, तसे शासनाच्या मान्यतेनंतर प्राधिकरणानेही दिले आहेत व ती रक्कम आताच्या थकबाकीमधून वसुल करावयाची आहे,या बाबीचा उल्लेख प्रस्तावांत दिसत नाही. त्यावर, ही बाब राहिली असल्याचे मान्य करुन शासनास सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये तिचा समावेश करुन, तसा प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत वित्त विभागास सादर करण्यात येईल, असे सांगण्यात आले. यावर अपर मुख्य सचिवांनी खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाने आढावा घ्यावा व कार्यवाही करावी, असेही सुचविले.

उपरोक्त चर्चेअंती प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना, राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत, मान्यता देण्यांत आली व तसा परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले.

## कार्यक्रम बाब क्र.७:- रेखाचित्र संवर्गातील विविध पदांना पुन: सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

दि.३१/१०/९८ च्या शासन निर्णयाव्दारे रेखाचित्र शाखेतील अनुरेखक,सहाय्यक आरेखक व आरेखक यांना पुन: सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली असून,ती प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांसाठी (रेखाचित्र शाखा संवर्गातील पदांना) प्रथम प्राधिकरणाची मान्यता घेवून व नंतर शासनाच्या मान्यतेनंतर ही वेतनश्रेणी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करावयाची आहे, यास मान्यता देण्यासाठी ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

प्राधिकरणाच्या रेखाचित्र शाखेत एकूण ६०१ कर्मचारी असून पुन: सुधारित वेतनश्रेणीमुळे येणारी १/१/९४ ते ३१/१२/९५ पर्यंतची वेतनातील फरकाची रक्कम रु.७३,९१,०२८/- इतकी असून ती कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह खात्यामध्ये जमा करावयाची आहे व १/१/९६ नंतर कर्मचाऱ्यांना दयावयाची रक्कम ही पाचव्या वेतन आयोगानुसार दयावयाची असल्याने, त्याचा विचार येथे होवू नये, असे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले.

उ.प्र.अ.

यावर, या सुधारित वेतनश्रेणीमुळे दयावयाची फरकाची रक्कम कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करावयाची आहे. तरीसुध्दा, याबाबत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी ही कार्यक्रम बाब प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्यें मान्यतेसाठी सादर करण्यांत यावी, असे मा.मंत्री महोदयांनी सुचविले. त्यानुसार ही कार्यक्रम बाब, पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचा निर्णय घेण्यांत आला.

## कार्यक्रम बाब क्र.८:- मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,अमरावती विभाग,यांच्या अंतर्गत अमरावती शहरामध्ये प्राधिकरणाच्या जागेवर मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांची निवासस्थाने बांधण्याबाबत.

मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.,अमरावती यांची निवासस्थाने बांधण्यासाठी येणारा एकत्रित खर्च अंदाजे रु.१५.६४ लक्ष असून हा.खर्च साधारणपणे रु.४८५ दर चौरस फूट असा येतो. मुख्य अभियंता यांच्यासाठी सुमारे १७१.९० चौ.मी. व अधीक्षक अभियंता यांच्यासाठी सुमारे १५०.५० चौ.मी.क्षेत्रफळाची निवासस्थाने बांधणे जरुरीचे असल्याने त्यास मान्यता देण्याची विनंती करण्यात आली.

अ.अभि.
समन्वय.

यावर अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी अशी निवासस्थाने बांधताना जागा प्रथम प्राधिकरणाने आपल्या नावे करुन घ्यावी जेणेकरुन पाणी पुरवठा योजना हस्तांतरणाच्या वेळी इमारत हस्तांतरणाचा प्रश्न उद्‌भवणार नाही, असे सांगून याबाबत त्यांनी ठाण्याचे उदाहरण दिले. यावर सदस्य सचिव(तांत्रिक)यांनी स्पष्ट केले की, इतर ठिकाणी हा प्रश्न उद्‌भवू शकतो पण अमरावती येथील निवासस्थान बांधण्याची जागा प्राधिकरणाची असल्यामुळे असा प्रश्न हस्तांतरणाच्या वेळी उद्‌भवणार नाही हे स्पष्ट केले. मात्र इतर ठिकाणी इमारत बांधतांना अपर मुख्य सचिवांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट केले. यानंतर या बाबीस मान्यता देण्यात आली.

अ.अभि.
समन्वय.
मु.अभि.ठाणे

चर्चेच्या ओघात, सर्वच सदस्यांनी व मा.राज्यमंत्री महोदयांनी असा मुद्या मांडला की, प्राधिकरणाकडून प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी दोन खोल्याचे विश्रांतीगृह बांधण्यांत यावे. यावर सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी बऱ्याच जिल्हयांच्या ठिकाणी अशी विश्रांतीगृहे असल्याचे निदर्शनास आणून दिले. यावर मा.राज्यमंत्री महोदयांनी,पाटलीपाडा,ठाणे येथील विश्रांतीगृहाचा उल्लेख करुन तेथे स्वच्छतेचा अभाव असल्याचे स्पष्ट केले. यावर स्वच्छतेबाबत दक्षता घेण्यात येईल, असे विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,यांनी सांगितले. यानंतर अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी असा मुद्या मांडला की, प्राधिकरणाची कार्यालये व निवासस्थाने, याबाबत प्रथम कार्यवाही करावी व काही काळानंतर अशी विश्रांतीगृहे बांधण्याबाबत विचार करावा. तसेच, जी विश्रांतीगृहे अस्तित्वात आहेत, त्यांची देखभाल व दुरुस्ती, तसेच स्वच्छतेबाबत विशेष दक्षता घ्यावी अशा सूचना केल्या. या सूचनेनुसार कार्यवाही करण्याचे मान्य केल्यानंतर या विषयावरील चर्चा संपविण्यात आली.

## कार्यक्रम बाब क्र.९:- प्राधिकरणाकडील विभागीय कार्यालयांना कामकाजाकरिता झेरॉक्स मशीन पुरविणे.

प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयामध्ये झेरॉक्स मशीन नसल्यामुळे झेरॉक्सची कामे बाजारातून करुन घ्यावी लागतात व या कामासाठी कर्मचाऱ्यांना बाहेर जावे लागते व कर्मचारी सतत व्यस्त राहतात. सध्या विभागीय कार्यालयातील झेरॉक्सींगच्या वाढलेल्या कामाचा विचार केल्यास विभागीय कार्यालयांना झेरॉक्स मशिन उपलब्ध करुन देणे जरुरीचे आहे. या अनुषंगाने हा प्रस्ताव सादर केल्या असल्याचे, सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले. प्रस्तावामध्ये, कॅनॉन झेरॉक्स कंपनीचे मशीन अथवा तत्सम दुसरे झेरॉक्स मशिन घेणे प्रस्तावित करण्यांत आले असून,त्यामुळे येणारा आर्थिक बोजा अंदाजित करण्यासाठी केंद्रीय भांडार, दिल्ली, यांनी कॅनन कंपनीच्या झेरॉक्स मशीनचे (मॉडेल NP 2120 ) मंजूर केलेले दर

वापरण्यात आले आहेत, हे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट करुन प्रत्यक्ष खरेदीच्या वेळी जे योग्य झेरॉक्स मशीन दर करारावर उपलब्ध असेल, तेच घेण्यांत येईल.

याबाबत, श्री.माधव कुलकर्णी, सदस्य, यांनी निदर्शनास आणून दिले की, रेट कॉन्ट्रॅक्टनुसार मोदी कंपनीच्या झेरॉक्स मशीनची किंमत कमी आहे. यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी पुन्हा स्पष्ट केले की, कॅननच्या ज्या मशीनचा अुल्लेख प्रस्तावात करण्यांत आला आहे, त्यासारख्या मोदी झेरॉक्स मशीनच्या मॉडेलचा क्र. ५६२० आहे. यापुढें, असेही स्पष्ट करण्यात आले की, रेट कॉन्ट्रॅक्टवर ज्या कंपनीचे मशीन उपलब्ध असेल, तेंच खरेदी करण्यांत येईल. यावर अपर मुख्य सचिव, यांनी असे स्पष्ट केले की, विभागीय कार्यालये जरी ८० असतील तरी, जेथें मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता, यांच्या कार्यालयाच्या इमारतीमध्येंच विभागीय कार्यालये आहेत, त्यांचा विचार या प्रस्तावामध्ये करु नये. तसेंच, दोन किंवा त्यापेक्षा जास्त विभागीय कार्यालयें एकाच इमारतीत असल्यास त्या सर्वांना मिळून एकच झेरॉक्स मशीन घ्यावे. ही बाब सदस्य सचिव(प्रशासन) यांनी मान्य करुन, अपर मुख्य सचिव यांच्या सूचनेनुसार आढावा घेवून, आवश्यक तेवढीच झेरॉक्स मशीन्स रेट कॉन्ट्रॅक्ट नुसार खरेदी करण्यांत येतील, असे स्पष्ट केले.

अ.अभि. समन्वय.

यावर, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांच्या वरील सूचनेनुसार आढावा घेवून, आवश्यक तेवढ्याच झेरॉक्स मशीनची खरेदी, दर करारातील दरानुसार, करण्याचे मान्य करण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र.१०:- प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षापर्यंत वाढविण्याबाबत.**

दि.२९ मे १९९८ च्या शासनाच्या वित्त विभागाच्या निर्णयानुसार, शासकीय कर्मचाऱ्यांचे, जिल्हापरिषदा व इतर संस्थांकडील कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षांपर्यंत वाढविले आहे. त्याचप्रमाणे प्राधिकरणाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षापर्यंत वाढविण्यांत यावे, तसेंच, प्राप्त परिस्थितीत प्राधिकरणाकडून शासन नियमावलीचेच पालन होत असल्यामुळे, प्राधिकरणाकडील दि.३१/५/९८ रोजी व त्यानंतर जे कर्मचारी सेवानिवृत्त होणार होते, त्या कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाने सेवानिवृत्त न करता, सेवेमध्ये ठेवले आहे, असे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट करुन त्यास मान्यता देण्याची विनंती केली.

यावर, मा.राज्यमंत्री महोदयांनी विचारणा केली की, प्राधिकरण स्वत:ची स्वतंत्र नियमावली का बनवित नाही. यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, स्वतंत्र नियमावली बनविण्यासाठी खूपच कालावधी लागणार असून, ही बाब खूपच किचकट आहे. सध्यातरी शासन नियमावलीचेच पालन होत असल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासनाकडून जे-जे निर्णय घेण्यांत येतात, तेच निर्णय प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांसाठी अंमलात आणण्यांत येतात. यावर काही सदस्यांनी सेवानिवृत्तीचे वय वाढविण्यास सहमत नसल्याचे स्पष्ट केले. यावर, मा.अध्यक्षांनी असे स्पष्ट केले की, राज्य शासन कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयाबाबत काहीतरी पुनर्विचार करीत असल्याने, शासनाच्या विचाराधीन असलेल्या या बाबींबाबत शासन काय निर्णय घेणार आहे, यासाठी थोडी वाट पहावी व त्यानंतरच सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याबाबत निर्णय घ्यावा. त्यानंतर ही बाब स्थगित ठेवावी, असा निर्णय घेण्यांत आला.

मु.प्र.अ.

**कार्यक्रम बाब क्र.११:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सध्याची आर्थिक परिस्थिती.**

म.जी.प्रा.च्या आर्थिक परिस्थितीबाबत प्राधिकरणाच्या प्रत्येक बैठकीमध्ये माहिती सादर करण्यांत यावी असा निर्णय घेण्यांत आला होता. त्या अनुषंगाने ही बाब सादर करण्यांत आल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

सन १९९८-९९ या वर्षात नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी प्राधिकरणाला एकूण रु.१११५.७७ कोटीची आवश्यकता असल्याचे स्पष्ट करण्यांत आले होते. यापैकी राज्य व केंद्र शासनाकडून मिळालेले अनुदान व प्राधिकरणाकडून उभारण्यांत आलेले कर्जरोखे याव्दारे डिसेंबर अखेर रु.१०७०.७३ कोटी निधी उभारण्यांत आला आहे. यापैकी डिसेंबर अखेर नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांवर एकूण ५२४.६४ कोटी खर्च करण्यांत आला आहे.

....९...

यानुषंगाने मा.मंत्री महोदयांनी असे निदर्शनास आणून दिले की, खर्चाचा विचार करता वरील प्रगती फारच असमाधानकारक आहे,त्यामुळे कामांची गती वाढविण्यासाठी त्वरीत सर्व मुख्य अभियंता यांची आढावा बैठक आयोजित करावी व कामांची गती वाढविण्याबाबत, त्यांना सूचना देण्यांत याव्यात. तसेंच प्राधिकरणाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवून व विशेष प्राधान्याने कामें पूर्ण करण्याबाबत निर्णय घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेंच एकीकडे पाणी पुरवठा योजनांसाठी सत्वर निधी उपलब्ध करुन दयावा/व्हावा, यासाठी प्रयत्न सुरु आहेत तर दुसरीकडे उपलब्ध निधी खर्च होवू शकत नाही, ही बाब फारच असामाधानकारक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

व.अभि. समन्वय.

यावर, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी कामांची गती वाढविण्यासाठी काय करावे, याबाबत सर्व मुख्य अभियंत्यांची बैठक बोलावून निर्णय घेण्याबाबत कार्यवाही करावी, तसेंच कोणत्या महसूल विभागासाठी किती खर्च करणे प्रस्तावित होते व प्रत्यक्ष झालेल्या खर्चात कोणत्या विभागात तफावत आढळते याचा आढावा घेवून, योग्य ती कार्यवाही करण्यास सांगितले, यानुसार, सर्व मुख्य अभियंत्यांची एक बैठक सत्वर आयोजित करण्याचे मान्य करण्यांत आले.

यानुषंगाने चर्चा करतांना, मा.अध्यक्षांनी स्पष्ट केले की, ज्या प्रमाणात कामें पूर्ण होणार आहेत, त्याच प्रमाणात आस्थापना व अवजारे या शिर्षावर निधी प्राप्त होणार आहे. प्राधिकरणास पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार, वेतनश्रेणी दयावयाची असल्यामुळें प्राधिकरणावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार आहे, या सर्वांचा मेळ घालावयाचा असल्यास, प्राधिकरणाकडून कामांची गती वाढविणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

चर्चेच्या ओघात, मा.राज्यमंत्री महोदयांनी रत्नागिरी जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी यांनी, त्यांच्या मागणीनुसार, निधी त्यांचेकडे प्राप्त होत नसल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे सांगितले. यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, वस्तुस्थिती अशी नसून, प्राधिकरणाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी केलेल्या मागणीनुसारच, त्यांना निधी वर्ग करण्यांत येतो. त्यामुळें वरील बाबीमध्ये तथ्य नसावे. तरीसुध्दा रत्नागिरी मंडळाकडे विचारणा करण्यांत येवून त्यांनी किती निधी मागितला होता व किती कमी निधी त्यांना प्राप्त झाला, याची माहिती घेवून ती मा.मंत्री महोदयांना देण्यांत येईल, असे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सांगितले. तसेंच कामाची प्रलंबित देयके यांच्यासाठी १००% निधी, अपेक्षित देयके यासाठी ७५% निधी या प्रमाणात साधारणत: निधीचे वितरण करण्यांत येत असल्यामुळे, निधी मागणीनुसार, उपलब्ध करुन दिला जात नाही, असे म्हणणे वस्तुस्थितीशी विसंगत वाटते, असेही सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

वि.स.व मु.ले.अ.
मु.प्र.अ.

स्थानिक संस्थांकडे असणाऱ्या थकबाकीबाबत, सदस्य सचिव(प्रशासन)यांनी असे स्पष्ट केले की, वसुलीबाबत, म्हणावा तितका प्रतिसाद स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मिळत नाही, त्यामुळे उद्दिष्टीत वसुली होवू शकत नाही. तसेच डिसेंबर ९८ अखेर प्राधिकरणाने रु.५७.४७ कोटी कर्ज परतफेड केली आहे. मात्र यापैकी फक्त रु.२३.३४ कोटी निधी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त झाला आहे. म्हणजेच रु.३३.१३ कोटी रक्कम कर्जफेडीसाठी प्राधिकरणास वळवावी लागली आहे. तसेंच, दि.३१/३/९९ पर्यंत आणखी रु.७६.५३ कोटी कर्ज परतफेड करावी लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून त्यांच्याकडील थकीत रक्कम देखील प्रमाणित करुन देण्यांत येत नाही. याबाबत, एकतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी थकबाकी संदर्भात त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, त्यानुसार थकबाकी प्रमाणित करुन दयावी अन्यथा प्राधिकरणाकडून जी थकबाकी प्रलंबित असल्याचे दर्शविण्यांत येते, ती थकबाकी तरी प्रमाणित करावी, अशा सूचना शासन स्तरावर निर्गमित कराव्यात, अशी विनंती सदस्य सचिव(प्रशासन) यांनी अपर मुख्य सचिवांनी केली, त्यानुसार कार्यवाही करण्याचे अपर मुख्य सचिव यांनी मान्य केले.

तसेच, या चर्चेमध्ये सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, १९९७-९८ मध्ये ई.टी.पी.चार्जेसपोटी प्राधिकरणास रु.९९.७७ कोटी इतके उत्पन्न मिळाले असून, प्रशासकीय खर्च रु.७२.९१ कोटी इतका झाला आहे. यावर, अपर मुख्य सचिवांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना पांचव्या केंद्रीय आयोगाच्या शिफारशीनुसार, सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यांत येणार असल्यामुळे, प्रशासकीय खर्चात वाढ होणार असल्याने व हा सर्व खर्च ई.टी.पी.मधून भागवावयाचा असल्यास जास्तीची कामे करुन जास्तीत-जास्त ई.टी.पी.चार्जेस

....१०....

कसे मिळतील याबाबत प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी विचार करणे जरुरीचे आहे. या कार्यक्रम बाबीवरील चर्चेअंती प्राधिकरणाच्या सर्व मुख्य अभियंत्यांची एक बैठक त्वरित बोलावून आढावा घ्यावा, ही बाब अपर मुख्य सचिव यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केली.

**कार्यक्रम बाब क्र.१२:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे राबविल्या जात असलेल्या नागरी पाणी पुरवठा योजनांचे कामाकरिता लागणारे सिमेंट कंत्राटदाराने आणणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून ज्या नागरी पाणी पुरवठा योजना राबविण्यांत येतात, त्यांना लागणारे सिमेंट प्राधिकरणाकडून पुरविण्यांत येते. कांही वेळा कामासाठी आवश्यक असणाऱ्या सिमेंटचा पुरवठा प्राधिकरणाकडून वेळेवर होऊ शकत नाही, त्यामुळें कामे रेंगाळल्यास त्याची जबाबदारी प्राधिकरणावर येते. त्यामुळें कामामध्ये या कारणास्तव उशीर होऊ नये, या बाबीचा विचार करुन जागतिक बँक अर्थसहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील पध्दतीनुसार व इतर ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील पध्दतीनुसार, नागरी पाणी पुरवठा योजनांना लागणारे सिमेंट, देखील कंत्राटदाराने आणण्यास परवानगी देण्यासाठी ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यांत आल्याचे, सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले व नागरी पाणी पुरवठा योजनेसाठी लागणारे सिमेंट कंत्राटदारानेच आणावे, या बाबीस मान्यता दयावी, अशी विनंती केली.

अ.अभि.
मुख्यालय.

बाजारामध्ये काय दराने सिमेंट उपलब्ध होते, याची विचारणा मा.राज्यमंत्री महोदयांनी केली असता, साधारणत: रु.२४०० प्रति टन बाजारभाव असल्याचे, सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सांगितले. तसेच प्राधिकरणास प्रत्येक वर्षासाठी साधारणपणे १०,००० टन सिमेंट लागते, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावर अपर मुख्य सचिवांनी असे सूचित केले की, प्राधिकरणास लागणारे एकूण सिमेंट कंत्राटदाराने आणल्यास, तसेच प्राधिकरणाने उपलब्ध करुन दिल्यास, काय खर्च येईल वा बचत होईल, याचा ताळेबंद देवून ही कार्यक्रम बाब प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये प्रस्तावित करावी, यास सर्वांनी मान्यता दिली.

## आयत्या वेळी सादर करण्यांत आलेल्या कार्यक्रम बाबी.

**कार्यक्रम बाब क्र.१ : गुणवत्तानियंत्रण, दक्षता, त्रयस्थ यंत्रणांकडून पहाणी व भरारी पथकाच्या निर्मितीबाबत.**

भरारी पथकाच्या निर्मितीबाबत, जी कार्यवाही करण्यांत आली आहे, त्याची माहिती देणारा प्रस्ताव या कार्यक्रम बाबीव्दारें सादर करण्यांत आल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

अ.अभि.
गु.नि.क.

यावर मा.राज्यमंत्री महोदयांनी भरारी पथक म्हणजे नेमके काय आहे, त्यांनी काय काम केले याबाबत कोठेही कांही दिसत नाही. तेंव्हा सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, प्रत्येक महसूल विभागासाठी भरारी पथकाची निर्मिती करण्यांत आलेली आहे. यावर, मा.राज्यमंत्री महोदयांनी अशा सुचना दिल्या की, या भरारी पथकामधील अधिकाऱ्यांना दि.१२/१/९९ रोजी त्यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी बोलाविण्यांत यावे. ही बाब सदस्य सचिव(प्रशासन) यांनी मान्य केली.

यानुषंगाने, चर्चेच्या ओघात, मा.मंत्री महोदयांनी असा मुद्दा मांडला की, प्राधिकरणातील संघटनेला या भरारी पथकाची निर्मितीच नको आहे. यावर सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले की, संघटनेने भरारी पथकास विरोध दर्शविला असला तरी, याबाबत करण्यांत येणाऱ्या कार्यवाहीमध्ये कुठेही शिथिलता आलेली नसून, कार्यवाही करणे सुरु आहे.

याबाबत, मा.राज्यमंत्री महोदयांनी असा मुद्दा मांडला की, प्राधिकरणाचे जे सदस्य आहेत, त्यांना अद्याप कोणत्याही सोयी देण्यांत आलेल्या नाहीत. एका महसूल विभागास एक याप्रमाणे भरारी पथकाच्या

**कार्यवाहीबाबत** आढावा घेण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यांत यावे. तथापि, या बाबीस मा.अध्यक्षांनी **विरोध दर्शवून** असे करता येणार नाही, हे स्पष्ट केले. तसेंच, शासनाच्या मान्यतेशिवाय आर्थिक सवलतीही देता येणार नाहीत, ही बाब देखील स्पष्ट केली.

त्यावेळी सदस्य सचिव(प्रशासन) व सदस्य सचिव(तांत्रिक),यांनी सांगितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदस्यांकडे कोणते काम सोपविण्यांत यावे, याबाबतचे प्रस्ताव त्यांनीच सादर करावेत, मग त्यावर विचार करण्यांत येईल व हे सर्वांनी मान्य केले.

<u>कार्यक्रम बाब क्र.२ :   शासनाने गेल्या ३ वर्षात पाणी पुरवठा क्षेत्रात केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणारी खास पुरवणी.</u>

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राज्यांतील पाणी पुरवठा क्षेत्रात गेल्या ३ वर्षात केलेल्या कार्यवाहीचा आढावा जनतेसमोर मांडण्यासाठी, राज्य शासनाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने जी ४ पानी खास रंगीत पुरवणी काढणे प्रस्तावित आहे, त्यासाठी लागणारा सुमारे रु.२६ लक्ष खर्च प्राधिकरणाने करणे या अनुषंगाने ही कार्यक्रम बाब प्रस्तावित असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

<u>जनसंपर्क अधि.</u>
<u>मु.प्र.अ.</u>

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने, मा.अध्यक्षांनी असे सांगितले की, या विषयाबाबत स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल, सबब, ही कार्यक्रम बाब वगळण्यात यावी .

वरील सर्व चर्चा झाल्यानंतर, श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य, यांनी त्यांच्याकडील इतर कामे वाढल्यामुळे वेळेअभावी ते, प्राधिकरणाच्या ,त्यांच्याकडे सोपविण्यांत आलेल्या जबाबदारीस योग्य तो न्याय देवू शकणार नाहीत, ही बाब स्पष्ट केली व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्याचा मनोदय व्यक्त करुन, तो मान्य करण्याची मा.अध्यक्षांना विनंती केली.

यानंतर या सभेचे कामकाज संपल्याचे मा.अध्यक्षांनी जाहिर केले व सभा संपली.